# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

## ♦♦♦ जाहिरात ♦♦♦

जाहिरात क्रमांक : रातुमनावि/सा.प्र./२०१ दिनांक : २७ मे, २०१६

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात कंत्राटी पद्धतीवर ११ महिन्याच्या कालावधीकरिता **लेखा परीक्षक** या पदावर (मानधनावर मानद स्वरूपात) नियुक्ति करावयाची आहे. त्यानुसार, संबंधितांकडून सदर पदाकरिता आवेदनपत्र मागविण्यात येत आहे.

(२) तसेच विद्यापीठातील विविध प्रकरणांची चौकशी करण्यास्तव विभागीय चौकशी अधिकाऱ्यांची सूची (पॅनल) (पारिश्रमिक स्वरूपात) तयार करण्याचे दृष्टिने **विभागीय चौकशी अधिकारी** या पदाकरिता देखील आवेदनपत्र मागविण्यात येत आहे.

वरील पदांसाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, पात्रतेच्या इतर निकषासंबंधीची तसेच मानधन/पारिश्रमिकाबाबतची विस्तृत माहिती आणि अर्जाचा विहित नमुना विद्यापीठाच्या www.nagpuruniversity.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

करिता, इच्छुक अर्जदारांनी जाहिरातीत नमूद सर्वसाधारण सुचनांचे लक्षपूर्वक वाचन करून पात्रतेच्या बाबींची पूर्तता करीत असल्यास विहित नमुन्यात माहिती भरून आवश्यक सहपत्रांसह एकूण पाच प्रतीत आपला अर्ज विद्यापीठात दिनांक **२० जुन, २०१६ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत** सादर करावा.

| अ.क्र. | पदाचे नांव | पदसंख्या | एकत्रित मानधन/पारिश्रमिक |
|---|---|---|---|
| (१) | **लेखा परीक्षक** | ०१ (एक) | एकत्रित मानधन रू.१५,०००/- प्रति माह. |
| (२) | **विभागीय चौकशी अधिकारी** | सूची तयार करण्यासाठी | • एका प्रकरणाच्या चौकशीकरिता रू.५,०००/- एवढे ठोक पारिश्रमिक.<br>• एकापेक्षा अधिक अपचारी असणाऱ्या प्रकरणाच्या चौकशीकरिता रू.८,०००/- एवढे ठोक पारिश्रमिक.<br>तसेच, प्रवास व इतर भत्ते विद्यापीठ नियमाप्रमाणे. |

### लेखा परीक्षक या कंत्राटी पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय व पात्रतेचे इतर निकष

१. मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी उत्तीर्ण.

२. शासकीय अथवा निमशासकीय सेवेच्या वर्ग-२ किंवा त्यापेक्षा वरील श्रेणीतील लेखा परीक्षण कार्याचा किमान पाच वर्षाचा अनुभव असलेली व सेवानिवृत्त झालेली व्यक्ती.

३. वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

४. संगणकाचे ज्ञान असणाऱ्यास प्राधान्य.

५. निवड केलेल्या उमेदवारांची प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल व विद्यापीठाच्या आवश्यकतेनुसार सदर प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना नियुक्त करण्याचे अधिकार विद्यापीठाला राहील.

**विभागीय चौकशी अधिकारी या पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय व पात्रतेचे इतर निकष**

१. मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी उत्तीर्ण.

२. शासकीय अथवा निमशासकीय सेवेच्या किमान वर्ग-१ श्रेणीतील सेवानिवृत्त झालेली व्यक्ती.

३. वय ७० वर्षापेक्षा अधिक नसावे.

४. शासकीय अथवा निमशासकीय सेवेतील आस्थापना/ प्रशासन विभागातील पर्यवेक्षकीय व विभागीय चौकशी कार्याचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य.

## अर्जदारांसाठी सर्वसाधारण सूचना

उमेदवारांनी आपले अर्ज भरण्यापूर्वी त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, इत्यादी बाबी पडताळून पाहाव्यात. तसेच खालील सूचना व अटींचे लक्षपूर्वक वाचन करावे.

१) सर्व पदांसाठी, पात्र ठरणाऱ्या उमेदवारास **मराठी भाषेचे ज्ञान** असणे आवश्यक आहे.

२) प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा.

३) आवेदकांनी विद्यापीठाच्या **www.nagpuruniversity.org** या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यामध्येच टंकलिखित, हस्तलिखित किंवा संगणकीय प्रिंट केलेला अर्ज (परिपूर्ण भरलेला अर्जाचा नमुना व संबंधित प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती) एकूण **पाच प्रतीत** सादर करावा. विहित नमुन्यातील अनुक्रमांकामध्ये/रकान्यामध्ये कुठलाही बदल करू नये. अर्ज भरतांना रकाने किंवा ओळी कमी पडत असल्यास अधिकची माहिती स्वतंत्र कागदावर द्यावी व तसे अर्जात योग्य त्या ठिकाणी नमूद करावे. **अर्जदाराने आवेदनपत्रातील "प्रपत्र-अ" मध्ये माहिती भरणे अत्यावश्यक आहे. सदर प्रपत्रात माहिती सादर न केल्यास आपल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.**

४) अर्जदाराने अर्जाच्या **किमान दोन प्रतीत** विहित नमुन्यात दर्शविलेल्या स्थानी स्वतःचा स्वसाक्षांकित केलेला फोटो चिटकवावा.

५) पात्र ठरणाऱ्या उमेदवारास मुलाखतीसाठी स्वतंत्रपणे पत्रव्यवहार केला जाईल.

६) मुलाखतीस उपस्थित राहतेवेळी उमेदवाराने सर्व आवश्यक व संबंधित प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती सोबत आणणे आश्यक आहे. **अर्जासोबत मुळ प्रमाणपत्रे संलग्नित करू नयेत.**

७) अर्जासोबत शैक्षणिक, अनुभव, वय, जात, जातवैधता, नॉनक्रिमिलेअर, इत्यादी आवश्यक व लागू असलेल्या प्रमाणपत्रांच्या छायांकित व सक्षम अधिकाऱ्याकडून प्रमाणित केलेल्या साक्षांकित प्रती जोडाव्यात. **अर्जासोबत मुळ प्रमाणपत्रे जोडू नयेत.**

८) प्रत्येक पदासाठी केलेला अर्ज सर्व दस्तावेजांसह वेगवेगळया लिफाफ्यात भरून --------------------------- **या पदासाठी अर्ज** असे लिफाफ्यावर लिहून "**मा. कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रशासकीय परीसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, अमरावती रोड, नागपूर -४४० ००१**" या पत्त्यावर **दिनांक २० जुन, २०१६ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत** पोहचेल अशा बेताने पाठवावे. यानंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा कुठल्याही परिस्थितीत विचार केल्या जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

९) सुवाच्च्य अक्षरात नसलेले, अपूर्ण, चुकीची माहिती भरलेले, विहित नमुन्यात नसलेले, आवश्यक शैक्षणिक अहर्ता व अनुभव धारण करीत नसलेले, वयोमर्यादेत मोडत नसलेले, अर्जासोबत अर्हता, अनुभव, वय, इत्यादी लागू असलेल्या प्रमाणपत्रांच्या छायांकित व स्वसाक्षांकित नसलेल्या प्रती जोडलेले अर्ज, टपालखात्याच्या दिरंगाईमुळे अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव उशीरा प्राप्त झालेले, इत्यादी त्रुटी असलेले अर्ज तसेच सर्व प्रमाणपत्रांसह पाच प्रतींमध्ये नसलेले अर्ज विचारात घेतल्या जाणार नाही व त्याबाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१०) अर्जदाराची शैक्षणिक पात्रता, अनुभव व वय हे अर्ज सादर करण्याच्या अंतिम तारखेपर्यंत ग्राहय धरण्यात येईल.

११) अर्जदाराने कोणत्याही प्रकारच्या चौकशीसाठी या कार्यालयाशी थेट वा मार्फत संपर्क साधू नये.

१२) पात्र ठरणाऱ्या उमेदवारास मुलाखतीस उपस्थित राहण्याकरिता कुठलाही खर्च देय असणार नाही.

१३) अर्जदाराने कार्यालयाशी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संपर्क साधणे अपात्र समजले जाईल.

१४) पदांच्या संख्येत वाढ किंवा घट झाल्यास, रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याबाबत, जाहिरातीत बदल किंवा दुरस्ती करण्याबाबत, तसेच संपूर्ण जाहिरात रद्द करण्याबाबतचे अधिकार "राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर" राखून ठेवीत आहे.

**कुलसचिव**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर